# विद्यापीठात रंगले 'तुघलक'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाच्यावतीने राज्य नाट्य स्पर्धेत सादर करण्यात आलेल्या 'तुघलक' या नाटकाचा प्रयोग मंगळवारी विद्यापीठातील ॲम्फी थिएटरमध्ये सादर करण्यात आला. गिरीश कर्नाड लिखित 'तुघलक' नाटकातून ऐतिहासिकबरोबरच मानवी व्यवहार, धर्म, राजकारणावर भाष्य करीत वास्तववादाचा धांडोळा घेण्यात आला आहे. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के, ज्येष्ठ नाट्य समीक्षक प्रा. अविनाश सप्रे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

हा दोन अंकी नाट्यप्रयोग विद्यार्थी विकास विभाग व मराठी, इंग्रजी आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता. या नाटकात तुघलक यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टी, त्यांनी घेतलेले निर्णय, राजधानी बदलण्याचा निर्णय, हिंदू-मुस्लिम सलोख्यासाठी केलेले प्रयत्न यांचे वास्तवदर्शी चित्रण आहे. नाट्यप्रयोगात संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे २५ विद्यार्थी कलाकार व तंत्रज्ञ सहभागी झाले होते. दिग्दर्शन ज्ञानेश मुळे यांनी केले. प्रकाशयोजना डॉ. संजय तोडकर यांनी केली. नेपथ्य विनायक सुतार, पार्श्वसंगीत रोहित जोशी, रंगभूषा सदा सूर्यवंशी, वेशभूषा ओंकार पाटील यांनी केली आहे. यावेळी विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, डॉ. रणधीर शिंदे, अक्षय सरवदे, मेघा पानसरे, नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2019

तरुण भारत

# प्रतिसरकार संकल्पना समजून घेण्याची गरज

## क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातील प्रा. मल्लिकार्जुन माळगी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व नागनाथ आण्णा नायकवडी यांनी प्रतिसरकार स्थापन करून जनतेला न्याय दिला. एकूणच त्यांनी महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याचा प्रयत्न प्रतिसरकारच्या माध्यमातून केला. त्यामुळे प्रतिसरकार संकल्पना तरुणांनी समजून घेऊन, त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. मल्लिकार्जुन माळगी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित 'क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या.



कोल्हापूर : व्याख्यानमालेत बोलताना प्रा. मल्लिकार्जुन माळगी.

प्रा. माळगी म्हणाले, महात्मा गांधी यांनी इंग्रजांना चले जावची घोषणा दिली. त्यानंतर इंग्रज गेले तरी जनतेला त्रास देणाऱ्या स्थानिक राजकारण्यांना धडा शिकवण्यासाठी जी. डी. बापू लाड व नागनाथ अण्णा नायकवडी यांनी प्रतिसरकारची स्थापना केली. त्यांच्या शब्दाखातर त्यांनी तयार केलेल्या तुफान सेनेत हजारो सैनिक सामील होवून देशाशाठी लढले. १९४२ मध्ये सेनोली परिसरात इंग्रज अधिकाऱ्यांचे पगार घेऊन जाणारी रेल्वे लुटली. यातील सर्व रक्कम शस्त्रे खरेदी करण्यासाठी व इंग्रजांबरोबर लढण्यासाठी वापरली. प्रतिसरकारने जनतेच्या हितासाठी चांगले निर्णय घेतले. कर्ज काढून लग्न करण्यापेक्षा साध्या पध्दतीने लग्न करण्याचा संदेश जी. डी. बापू ला यांनी कृतीतून दिला.

अध्यक्षस्थानावरून डॉ. भारती पाटील म्हणाल्या, तरुण पिढीला जी. डी. बापु लाड यांच्या कार्याची ओळख झाली पाहिजे. त्यांच्या विचारातून राष्ट्राच्या बळकटीसाठी बळ मिळेल. तसेच महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करता येईल. यावेळी क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अरुण लाड, वसंतराव लाड, व्ही. वाय. पाटील, अशोक पवार, इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनीश पाटील, स्नेहल पाटील आदी उपस्थित होते.

लोकमत

# मेघा पानसरे यांना 'सिर्गेइ इसेनिन' पुरस्कार

## थिरुवनंतपूरम येथे कार्यक्रम : विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. मेघा पानसरे यांना रशियन सांस्कृतिक केंद्र, थिरूवनंतपूरम व शासकीय इसेनिन म्युझियम, मॉस्को या संस्थांच्या वतीने 'सिर्गेइ इसेनिन पुरस्कार-२०१९' या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

थिरुवनंतपूरम येथे रशियन दूतावासातर्फे आयोजित रशियन भाषा व साहित्य महोत्सवात डॉ. पानसरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महान रशियन कवी सिर्गेइ इसेनिन यांची मूर्ती, प्रमाणपत्र, पदक असे पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. मेघा पानसरे यांचे रशिया व रशियन संस्कृतीसंबंधी लेखन, साहित्यिक भाषांतर, या विषयावरील आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन, रशियन भाषा व साहित्य अध्यापन या कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.



**शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. मेघा पानसरे यांना थिरुवनंतपूरम येथील रशियन भाषा व साहित्य महोत्सवात 'सिर्गेइ इसेनिन' आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

केरळ विधानसभेचे अध्यक्ष पी. श्रीरामकृष्णन, थिरुवनंतपूरमचे महापौर के. श्रीकुमार, केरळचे मुख्य सचिव टॉम जोस, 'रुसोत्रुद्नीचेस्त्वो' या संस्थेचे मुख्य प्रतिनिधी फ्योदर राझोव्स्की यांनी मनोगत व्यक्त केले. रशियन दूतावासाच्या तत्याना पिरोवा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. रशियन संस्कृती केंद्र थिरुवनंतपुरमचे संचालक रतीश नायर यांनी स्वागत केले.

# सिर्गेइ इसेनिन पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर, ता. १८ :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. मेघा पानसरे यांना तिरुवनंतपूरमधील रशियन सांस्कृतिक केंद्र व मॉस्कोतील शासकीय इसेनिन म्युझियम संस्थेतर्फे 'सिर्गेइ इसेनिन पुरस्कार - २०१९' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. तिरुवनंतपुरम येथे रशियन दूतावासातर्फे आयोजित 'रशियन भाषा व साहित्य महोत्सवात डॉ. पानसरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रशियन भाषा व साहित्य लोकप्रिय करण्यात त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल महान रशियन कवी सिर्गेइ इसेनिन यांची अर्ध-मूर्ती, प्रमाणपत्र व पदक या स्वरूपात हा सन्मान झाला. डॉ. पानसरे यांचे रशिया व रशियन संस्कृतीसंबंधी लेखन, साहित्यिक भाषांतर, रशियन साहित्यिक भाषांतर या विषयावर आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन, रशियन भाषा व साहित्य अध्यापन या कार्याची दखल घेऊन त्यांची पुरस्कारासाठी निवड झाली.

या वेळी डॉ. पानसरे म्हणाल्या, ''हा पुरस्कार म्हणजे तीस वर्षांच्या या क्षेत्रातील कामाचा सन्मान आहे. रशियन भाषा अध्यापन व साहित्यिक भाषांतर यातून एका नव्या भाषेच्या कौशल्याबरोबरच एका नव्या संस्कृतीची ओळख होते. विवेकी विचार, बहुभाषिकता व बहुसांस्कृतिकतेचा आदर' हे मूल्य रुजवले जाते. त्यांनी सिर्गेइ इसेनिन यांच्या कवितांच्या मराठी अनुवादाचा संग्रह प्रकाशित करण्याचा संकल्प व्यक्त केला.''

नवी दिल्ली येथील रशियन दूतावासाच्या अंतर्गत असलेले केरळ विधानसभेचे अध्यक्ष पी. श्रीरामकृष्णन, तिरुवनंतपूरमचे महापौर के. श्रीकुमार, केरळचे मुख्य सचिव टॉम जोस, फ्योदर राझोव्स्की यांनी मनोगत व्यक्त केले. केंद्राचे संचालक रतीश नायर यांनी प्रास्ताविक केले. या वेळी तत्याना पिरोवा उपस्थित होत्या.




**तिरुवनंतपूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. मेघा पानसरे यांना 'सिर्गेइ इसेनिन पुरस्कार प्रदान करताना केरळ विधानसभेचे अध्यक्ष पी. श्रीरामकृष्णन, शेजारी के. श्रीकुमार, मुख्य सचिव टॉम जोस, फ्योदर राझोव्स्की, रतीश नायर.**